# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

**२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे. -४११ ००१.**

(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )

Website : http//:barti.maharashtra.gov.in

**बँक, रेल्वे, एल.आय.सी. इत्यादी व तत्सम स्पर्धा परिक्षेच्या पूर्वतयारी करिता अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून यवतमाळ जिल्हयामध्ये नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) साठी अर्ज मागविण्यात येत आहे.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अमरावती विभागातील यवतमाळ जिल्हयामध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी बँक, रेल्वे, एल.आय.सी. इत्यादी व तत्सम नोकरीच्या संधी तसेच Aptitude Test आणि Interview वर आधारित खाजगी व कॉर्पोरेट क्षेत्रातील चांगल्या नोकरीच्या संधी याकरीता घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परिक्षांच्या पूर्वतयारी करिता नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) खालील नमूद केलेल्या प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. इच्छूक व पात्र उमेदवारांनी संबंधित जिल्ह्यातील केंद्राशी संपर्क साधून त्या केंद्राकडे अर्ज करावा.

पात्र युवक-युवतींना https://barti.maharashtra.gov.in या वेब साईटवरून 'Notice Board' च्या सदराखाली बँक, रेल्वे, एल.आय.सी. लिंकवरून अर्ज डाऊन लोड करून किंवा खालील नमुद प्रशिक्षण केंद्राच्या कार्यालयातून प्राप्त करून, खालील पैकी ज्या ठिकाणी त्यांना प्रशिक्षण घ्यावयाचे आहे, त्या केंद्रावर **दि. १० जुन, २०२३ पासून** परिपूर्ण भरलेला अर्ज कागद पत्रांसह सादर करावा.

| अ.क्र. | जिल्हा | प्रशिक्षण संस्थेचे नाव / पत्ता / दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | **यवमताळ** | **मैत्रेय करियर ॲकेडमी, यवतमाळ**<br>**शंकरलाल कोठारी विदयामंदिर, समर्थवाडी, जिल्हा - यवतमाळ - ४४५००१**<br>**मोबाईल नंबर - ७०२०२६९०६३ / ९४०५३२६५८७** |

उपरोक्त प्रत्येक प्रशिक्षण केंद्रामध्ये १५० अनुसूचित जातीचे विद्यार्थी निवड केले जातील व २० विद्यार्थ्यांची प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल. त्यामध्ये ३० टक्के जागा महिलांसाठी, ४ टक्के जागा **"दिव्यांग" असलेल्या व्यक्ती (Person with Disability)** जागा राखीव राहतील.

**पात्रता :- १)** महाराष्ट्र राज्याचा अनुसूचित जाती व नवबौध्द मधील उमेदवार असावा.
**२)** अर्जदाराचे वय १८ ते ३४ पर्यंत असावे.
**३)** अर्जदार किमान १२ वी उतीर्ण किंवा कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण असणारा असावा.

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :-**

**१)** वर नमुद प्रशिक्षण केंद्रांकडे अर्ज दाखल करण्याची **शेवटची तारीख दि.३० जुन, २०२३**
**२)** प्रशिक्षण कालावधी ६ महिन्यांचा राहील.
**३)** विहीत नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रांसहीत अर्ज दाखल केलेल्या पात्र उमेदवारांची चाळणी परीक्षा (screening test) वर नमुद संस्थेमार्फत **दि.१६ जुलै, २०२३** रोजी दुपारी १२.०० ते ०२.०० वा. दरम्यान घेण्यात येईल. त्याआधारे उमेदवारांची गुणानुक्रमे कोंचिगसाठी निवड करण्यात येईल.
**४)** **प्रशिक्षण कोंचिग क्लास दि. ०१ ऑगस्ट, २०२३** किंवा त्या दरम्यान सुरु करण्यात येईल.
**५)** निवड झालेल्यापैकी पात्र विद्यार्थी प्रशिक्षणाकरीता रोज किमान ३ तास व त्यापेक्षा जास्त कालावधीकरीता उपस्थित राहील. तसेच एकूण दरमहा ७५ टक्के पेक्षा जास्त कालावधी प्रशिक्षणास उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा रुपये ६०००/- विद्यावेतन (Stipend) अनुज्ञेय राहील
**६)** विद्यार्थ्यांना रु. ५०००/- एवढ्या किंमतीचे नि: शुल्क अभ्यास साहित्य व पुस्तकांचा संच बार्टी द्वारे देण्यात येईल.
**७)** सदर प्रशिक्षण (Coaching) कार्यक्रम उपरोक्त **प्रशिक्षण केंद्रामार्फत** राबविण्यात येणार आहे. तरी अमरावती विभागातील यवतमाळ जिल्ह्यामध्ये कोंचिग घेण्यासाठी इच्छुक अनु. जाती मधील उमेदवार त्या जिल्ह्यातील संबंधित प्रशिक्षण केंद्रावर जाहिरातीनुसार अर्ज करु शकतील.
**८)** विहीत नमुन्यातील अर्ज वर नमुद केलेल्या प्रशिक्षण केंद्रांच्या कार्यालयाकडून किंवा बार्टी, पुणे या संस्थेच्या वेबसाईट वरुन प्राप्त करुन भरता येईल. अधिक माहितीसाठी वर नमुद प्रशिक्षण केंद्रांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.
**९)** ज्या उमेदवारांनी यापूर्वी बार्टी, पुणे मार्फत बँक, रेल्वे, एल.आय.सी. इत्यादी व तत्सम स्पर्धा परीक्षा व तसेच MPSC / UPSC प्रशिक्षण (कोंचिग) घेतले असेल, त्यांची पुन्हा नव्याने प्रशिक्षणासाठी गुणाक्रमे निवड केली जाणार नाही.
**१०)** सदर योजनेबाबत / प्रशिक्षणाबाबत काही वाद अथवा धोरणात्मक पेच प्रसंग निर्माण झाल्यास याबाबतचे अंतिम सर्व अधिकार महासंचालक, बार्टी तसेच शासनास राहतील.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१) उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो.
२) जातीच्या प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत.
३) अर्जदार किमान १२ वी उतीर्ण अथवा कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण केलेले प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत.
४) शाळा सोडल्याचा दाखला सांक्षाकित प्रत.
५) उमेदवाराचे आधार कार्ड सांक्षाकित प्रत.
६) दिव्यांग असल्यास ४०% पेक्षा जास्त प्रमाणात असलेल्या दिव्यांगत्वाचा दाखला सांक्षाकित प्रत.
७) विद्या वेतनकरिता सद्यस्थितीत सुरू असलेले स्टेट बँक ऑफ इंडिया चे बचत खाते असणे अनिवार्य राहिल.

**(सुनिल वारे)**
**महासंचालक, बार्टी, पुणे.**

जाहिरात/बॅच क्र.०१/आय.बी.पी.एस/२०२३-२४/

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.**
२८ क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे- ४११ ००१.
(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

## महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या युवक-युवतींसाठी बँक, रेल्वे, एल. आय. सी. इ. व तत्सम नोकरीच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण

### विहीत नमुना अर्ज

१. संपूर्ण नाव - (आडनाव) (नाव) (वडील/पति) :

२. लिंग (पुरुष /स्त्री / इतर) :

३. जन्म दिनांक :

४. अनुसूचित जाती व नवबौध्द (होय / नाही) :

५. पत्र व्यवहाराचा पूर्ण पत्ता :

६. कायमचा पत्ता :

७. दूरध्वनी/मोबाईल क्रमांक :

८. आधार क्रमांक :

९. ई-मेल आयडी :

१०. स्टेट बँक खाते - (होय / नाही) :

११. पदवी परीक्षा उत्तीर्ण गुण :

१२. दिव्यांग व्यक्ती - (होय / नाही) :

१३. रहिवासी दाखला :

१४. कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रू.(उत्पन्नाचा दाखला) :

१५. ठिकाण :

१६. दिनांक :

विद्यार्थ्याची स्वाक्षरी

पुर्ण नाव